**कृपया प्रसिध्दिसाठी** **11 मे 2009**

## भाजपा नेते व माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक यांनी सोमवार, दिनांक 11 मे 2009 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत केलेले निवेदन

### *मेट्रो रेल्वेला पाठींबा; पण कारशेडला विरोध*

**मुंबई, सोमवार :** मुंबईत मेट्रो रेल्वे होण्यास माझा पाठींबा आहे. परंतु सदर रेल्वेसाठी चारकोप येथे कारशेड करण्यास माझा विरोध राहील कारण त्यामुळे हजारो नागरिक बेघर होणार आहेत, असे स्पष्ट प्रतिपादन मेट्रो रेल्वे संदर्भात आज झालेल्या सार्वजनिक सुनावणीच्यावेळी भाजपा नेते व माजी केंद्रीय मंत्री श्री राम नाईक यांनी केले. सार्वजनिक सुनावणीनंतर आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना श्री. नाईक यांनी ही माहिती दिली.

सर्वसामान्य मुंबईकरांप्रमाणे उपनगरी रेल्वे प्रवास काहीसा सुखकर व्हावा यासाठी मेट्रो रेल्वे प्रकल्पाला माझा पाठिंबा आहे. मात्र त्यासाठी चारकोप येथील गणेश नगर, संयज नगर, लालजी पाडा, गांधी नगर, एकता नगर, जनता कॉलनी येथील हजारो नागरिकांना बेघर करणे माणुसकीला धरुन नाही आणि त्यासाठीच चारकोप येथे प्रस्तावित केलेल्या कारशेडची जागा बदलली पाहिजे, असे स्पष्ट प्रतिपादन श्री. राम नाईक यांनी आज सरकारने ठेवलेल्या जाहीर सुनावणीच्या वेळी केले. श्री. राम नाईक यांनी पाच वेळा लोकसभेत प्रतिनिधीत्व केलेल्या उत्तर मुंबईतच प्रस्तावित कारशेड आहे. तसेच श्री. राम नाईक रेल्वे राज्य मंत्री असतानाच दिल्लीत मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्यात आला. त्यामुळे या विषयाशी संबंधित सर्व पैलूंची श्री. नाईक यांना जाणीव आहे. म्हणूनच चारकोप येथील प्रस्तावित भूखंडावर 14,000 कुटुंबे राहतात. त्याच जागी अनेक मान्यताप्राप्त शाळा, मंदिर, मशिद, चर्च तसेच अनेक उद्योग व दुकानेही आहेत. या सर्वांना विस्थापित करण्यापेक्षा चारकोप ते दहिसर परिसरात अन्यत्र रिकामा असलेला भूखंड कारशेडसाठी वापरावा अशी मागणीही या सार्वजनिक सुनावणीच्या वेळी श्री. राम नाईक यांनी केली. स्थानिक जनतेचा येथे कारशेड होण्यास प्रचंड विरोध आहे हेही श्री. नाईक यांनी लक्षात आणून दिले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी स्थानिक रहिवाश्यांचे म्हणणे मान्य न करता दडपशाहीने प्रकल्प राबवू इच्छितात हे लक्षात आल्यामुळे हजारो नागरिकांच्या स्वाक्ष-यांचे निवेदन पाठवून श्री. नाईक यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्याकडे भेटीसाठी 11 सप्टेंबर 2008 रोजी वेळ मागितली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आणखी तीन स्मरणपत्रेही लिहीली. सध्या राज्यावर असलेल्या मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनाही 19 डिसेंबर 2008, 18 जानेवारी व 4

फेब्रुवारी 2009 रोजी पत्रांद्वारे चर्चेसाठी वेळ मागितली. खुद्द पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्याकडेही दोनदा भेटीची मागणी केली. या सर्वांनी साधी पोच देण्याचे सौजन्यही न दाखवून सार्वजनिक हिताच्या प्रकल्पासाठी या सरकारची संवादहीनतेची भूमिका असल्याचे दाखवून दिले आहे. हे धोरण सोडून या संबंधी चर्चा करुन मार्ग काढला न गेल्यास दुसरे 'सिंगूर' घडेल असा ईशाराही श्री. नाईक यांनी या सुनावणीच्यावेळी दिला.

हा प्रकल्प खाजगी सहभागातून होणार आहे. त्यामुळे मुंबईतील सर्व प्रकल्पबाधितांचे नेमके कोणत्या अटींवर पुनर्वसन होईल हे ठरवून मगच कामाला सुरुवात केली पाहिजे अन्यथा प्रकल्पात वारंवार अडथळे येतील, अशी सूचनाही या सुनावणीच्या वेळी श्री. राम नाईक यांनी केली. मेट्रो रेल्वे मुळे कोणते व किती नागरिक बाधित होतात हे लक्षात येण्यासाठी प्रत्यक्ष जमिनीवर रेखांकन करण्याची मागणीही श्री. राम नाईक यांनी केली. खर्च मर्यादित ठेवण्यासाठी मेट्रो रेल्वे ब्रॉड गेजच करावी, तसेच तिचे भाडे सामान्य प्रवाशांना परवडणारे असावे, नियोजित भाडे हे उपनगरीय रेल्वेच्या चौपट व बेस्ट बस भाड्याच्या दुपटीपेक्षाही जास्त आहे. ते प्रवाशांना परवडणारे नाही. मेट्रो रेल्वेच्या भाडे आकारणीवर महाराष्ट्र विधीमंडळाचे नियंत्रण असावे अशा सूचनाही श्री. नाईक यांनी केल्या.

वारंवार निविदा काढूनही मेट्रो रेल्वेसाठी कोणीही बोली लावली नाही अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रांतून येतात, त्याबाबतही सरकारने स्पष्ट खुलासा केला पाहिजे म्हणजे जनतेत विश्वास निर्माण होईल, असे आग्रही प्रतिपादनही जाहीर सुनावणीच्यावेळी श्री. नाईक यांनी केले.

**(कार्यालय सचिव)**